स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 01–01–2018 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 4. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 5. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 6. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 8. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 9. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 10. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 11. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 2. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 3. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 4. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 5. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 340:– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 6 (अ) अंतर्गत सुदाम नगर, यादव नगर, महेंद्र नगर, येथे भुमिगत आर.सी.सी. पाईप लाईन टाकण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. सयय्द नाझीम अली यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 35,93,835/– पेक्षा 20.10 टक्के कमी दराची रू. 28,71,474/–(रूपये अठ्ठाविस लक्ष एकातर हजार चारशे चौ–याहत्तर) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 619 (A43901371913) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 341:— प्रभाग क्र. 2 (ड) मधील तक्षशीला नगर येथील नारी घाटाची
{कार्य अभि झोन 9} विकास कामे करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,41,46,545/— पेक्षा 13.59 टक्के कमी दराची रू. 1,22,24,029/—(रूपये एक कोटी बावीस लक्ष चौवीस हजार एकोणतीस) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच, हे काम पद क्र. 253 (A23501130807) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 342:— प्रभाग क्र. 2 (ड) (जुना 4—ब) अंतर्गत बनातवाला इंग्रजी
{लोककर्म झोन 09} प्राथमिक शाळेला संरक्षण भिंत, चौकीदार निवास व्यवस्था फुटपाथ व सांडपाणी वहन व्यवस्था करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांच्या मुळ प्राकलनीय राशी रु. 70,16,565/— पेक्षा 14.71 टक्के कमी दराची रू. 59,84,344/— (रूपये एकोणसाठ लक्ष चौ—यांशी हजार तीनशे चव्वेचाळीस) च्या निविदेस मंजूरी देण्याचा तसेच, हे काम पद क्र. (A45202072702) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने

ठराव क्रमांक 343:— प्रभाग क्र. 24, (क) जलाराम नगर येथे सिमेंट रोडचे
{लोककर्म झोन 08} बांधकाम कामास्तव रु. 47,72,091/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 344:— 1. नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा
{जनसंपर्क विभाग} सूचना, जाहीर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करून वर्तमानपत्र, रेडीओ, टि.व्ही. इ. (इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडीया) प्रसार माध्यमांमार्फत प्रसारित करण्याकरीता म.न.पा. पॅनेलवर एजन्सी नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी ई. निविदा सूचनेद्वारे निविदा मागविल्या असता पात्र निविदाधारका मधून प्रत्येक जाहिरातीवर सर्वाधिक 11 टक्के सुट देवू करणाऱ्या मे. गोल्डमाईन ॲडव्हरटायझिंग लि. व मे. प्रतिसाद कम्युनिकेशन प्रा. लि. या दोघांचे दर सारखे असल्यामुळे यांना जाहिरात निर्मिती व वितरणाचे काम विभागून देण्याकरीता प्रथम एक वर्षाकरीता कार्यादेश देण्यास व दरम्यानचे काळात एजन्सीचे काम समाधानकारक आढळल्यास पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. तसेच उपरोक्त दोन्ही एजन्सीचे दर एकसारखेच असल्याने दोन्ही एजन्सीला समप्रमाणात कामे विभागून देण्याची शिफारस वित्त विभागाने केलेली आहे. त्यामुळे दोन्ही एजन्सीची सोडत (ड्रॉ) काढून देयकाचे भुगतान सोयीचे व्हावे यादृष्टीने प्रत्येक एजन्सीला एक—एक महिना याप्रमाणे आळी—पाळीने कामे देण्याचा त्याचप्रमाणे विशेष प्रसंगी दर्शनी जाहिरातीचे काम विभागून देण्याचा प्रश्न विचारात घेऊन एकमताने मंजूरी प्रदान केली.

3. त्याचप्रमाणे जाहिरातीची कामे खोळंबु नये म्हणून विद्यमान एजन्सी मे. प्रॉफिट ॲडव्हरटायझर्स (इं.) प्रा. लि. नागपूर यांच्या कार्यादेशाची मुदत दि. 05.10.2017 रोजी संपुष्टात आली असल्यामुळे विद्यमान एजन्सीला पुढील तीन महिन्याकरीता किंवा नवीन एजन्सीला कार्यादेश देईपर्यंत (यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत) मुदतवाढ देण्याचा प्रश्न विचारात घेऊन एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच रु. 1.00 कोटी ची वित्तीय मान्यता विभागाने केलेल्या सुचनेप्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 345:— 2,000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4
{अग्निशमन विभाग} नग Small Water Fire Tender फेब्रिकेशन कार्याचे 18.73% कमी राशीची निविदा दर मंजूर करण्याबाबत.

विभागाने 2000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4 नग स्मॉल वॉटर फायर टेंडरचे फेब्रिकेशन कार्याची निविदा मागविली होती. ज्यामध्ये M/s. Wadia Body Builders, Ahmedabad यांचेकडून निम्नतम निविदा दर रू. 80,00,000 (कर वेगळे) प्रमाणे प्राप्त झाले होते.

सध्या म.न.पा.तर्फे शासनाचे www-mahatenders.gpv.in या वेबसाईटवर निविदा प्रक्रिया करण्यात येते. ही प्रणाली नविन असल्याने या प्रणालीची दरसूची (Bills of Quantity) समजण्यास चुक झाली. व निविदादराला स्थायी समितीची मान्यता घेण्यास विषयाचे प्रारूपमध्ये अनवधाने निम्नतम निविदा दर रू. 80,00,000 (सर्व करांसहित) याप्रमाणे सादर करण्यात आले होते. सदर विषयास स्थायी समिती ठराव क्र. 219 दि. 07.11.2017 नुसार एकमताने मंजुर केल्यानंतर या विषयास कार्यान्वित सुध्दा करण्यात आले. .

करीता 2000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4 नग स्मॉल वॉटर फायर टेंडरचे फेब्रिकेशन कार्य M/s. Wadia Body Builders, Ahmedabad यांचेकडून निम्नतम निविदा दर रू. 80,00,000 (कर वगळून) प्रमाणे करून घेण्याचे सुधारित विषयास मा. स्थायी समितीने विचारात घेवून या विषयास मंजूरी प्रदान करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 346:— प्रभाग क्र. 23 अ हिवरी ले आऊट येथे श्री चाफले ते श्री.
{लोककर्म झोन 08} ओस्तवाल यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे कामास्तव रू. 67,81,139/— राशिचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधुन आर्थिक वर्ष 2017—18 मध्ये रू. 61,74,500/— लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

ठराव क्रमांक 347:— प्रभाग क्र. 24, (ड) ढोबळे लेआऊट लता मंगेशकर गार्डन येथे
{लोककर्म झोन 08} सिमेंट रोडचे बांधकामास्तव रू. 38,29,454/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 348:— प्रभाग क्र. 28 — ब अंतर्गत सर्वश्रीनगर येथील नाल्याच्या
{लोककर्म झोन 05} (आर.सी.सी.) भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रूपये 33,80,250/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 349:— झोन क्र. 9, प्रभाग क्र. 6(अ) विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था
{विद्युत विभाग} करण्याकरिता रु. 47,84,029/— च्या तुलनेत 1.09% ने कमी दराची रु. 47,31,883/— ची मे. व्ही.एस. एन्टरप्रायझेस, नागपूर यांची निम्नतम दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 350:— प्रभाग क्र. 37(ड) येथील प्रोसेस सर्वेअर कॉलोनी परिसर व
{लोककर्म झोन 01} विविध ठिकाणी रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निविदाकार मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दराची रू. 29,99,986/— (रूपये एकोनतीस लक्ष, नव्यांन्नव हजार नऊशे छयांशी फक्त) ची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 (682) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 351:— प्रभाग क्र. 30 (अ) अतकर लेआऊट येथील त्रिकोणी
{उद्यान विभाग} जागेत उद्यान विकसित करण्याकरिता विविध कामे करण्याचे रू. 26,26,932/— (अक्षरी सव्वीस लक्ष सव्वीस हजार नऊशे बत्तीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. (सदर खर्च पद क्र. A46001673101 अंतर्गत प्रस्तावित)

ठराव क्रमांक 352:— प्रभाग क्र. 30 — ड येथील क्युरइट हॉस्पीटल च्या मागे व
{लोककर्म झोन 05} निराला सोसायटी येथे रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 39,76,423/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 353:— नागपूर शहराकरीता सिमेंट कॉंक्रिट रोड फेज — II पॅकेज क्र.
{लोककर्म विभाग} 20 अंतर्गत चे काम पूर्णत्वास आहे या कामाकरीता पद क्र. A42001470514 अंतर्गत रू. 17,62,71,081/— ला प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे व तांत्रिक मान्यतेची राशी रू. 15,95,21,337/— ऐवढी आहे. सदर काम पुर्व तांत्रीक मान्यतेची राशीमध्ये पुर्ण होत नसल्याने सुधारीत तांत्रीक मान्यतेची राशी रू. 18,45,34,061.00 नुसार 2,50,12,724.00 रू. चे वाढीव प्राकलनाला व यास्तव जुन्या कंत्राटदार मे. आर.एम. दयारामानी यांच्या पूर्व करारनामा व दरानुसार (8% Below) रू. 2,30,11,706.00 चे अतिरीक्त कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 354:— प्रभाग क्र. १०(ड) अंतर्गत मंजीदाना कॉलोनी, पटेलनगर,
{लोककर्म झोन 10} आदिवासीनगर, बोरगांव व विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. ५९,९९,१४८/— (एकोणपन्नास लक्ष नव्यानऊ हजार एकशे अठ्ठेचाळीस रूपये फक्त) रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेऊन तसेच नविन पद क्र. A२२००१३३०८०२ (जुने पद क्रमांक ६८१) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 355:— प्रभाग क्र. १०(ड) अंतर्गत मंजीदाना कॉलोनी, व्दिवेदी
{लोककर्म झोन 10} कॉलोनी येथे नाल्याचे भिंतीचे बांधकामास्तव रू. ९९,९७,७९९/— (नव्यानऊ लक्ष सत्यांनव हजार सातशे नव्यानऊ रूपये फक्त) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा

मागवून हाती घेऊन तसेच नविन पद क्र. A४३९०१३७०८१२ (जुने पद क्रमांक ६१८) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 356ः— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. 27 — अ अंतर्गत वृंदावन नगर व सदभावना नगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 32,78,660/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 357ः— {अभियोक्ता विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या प्रत्येक झोनकरिता एक विधी सहायक तसेच विधी विभागाकरिता दोन विधी सहायक देण्याची मागणी योग्य आहे व याकरिता प्रस्तावित आकृतीबंधात संशोधन करुन विधी सहायकाचे एकूण 12 पदे नव्याने निर्मित करण्याबाबतचा प्रस्ताव त्वरित विधी विभागामार्फत सादर करण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी अभियोक्ता यांना दिले होते. उक्त दिशानिर्देशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात आलेल्या आकृतीबंधात विधी सहायकाची 4 च्या ऐवजी 12 पदे नव्याने निर्मित करण्याबाबतचा फेर प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून मा. आयुक्त व मा. महापौर यांच्या मंजुरीने दि. 10.11.2017 रोजी महाराष्ट्र शासनाला मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. संशोधनाबाबतची टिपणी व दिनांक 10.11.2017 रोजीचे पत्र आपल्या माहितीस्तव नस्तीत उजव्या बाजूस टाचण करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासनाकडुन आकृतीबंधाला मंजुरी मिळण्याकरिता तसेच मंजुरी मिळाल्यानंतर स्थायी विधी सहायकांची नियुक्ती करीता कमीत कमी एक ते दिड वर्षाचा कालावधी लागणार अशी विभागाची धारण आहे. विधी विभागाचा वाढता कामाचा व्याप तसेच न्यायालयीन प्रकरणात भरारीने होणारी वाढ बघता 12 विधी सहायकांची तातडीने नियुक्ती करण्याची गरज विभागाला वाटते. करीता स्थायी विधी अधिकाऱ्यांची नियुक्ती होईपर्यंत रु. 10,000/— च्या मासिक मानधनावर अस्थायी विधी सहायकांची नियुक्ती करता येईल. 12 विधी सहायकांकरिता रु. 10,000/— दरमाह प्रमाणे एकूण 1,20,000/— चा खर्च दर महिन्याला अपेक्षित असून एका वर्षाकरिता हा खर्च रु. 14,40,000/— इतका होईल, करीता मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे विभागीय प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीकरिता सादर प्रस्तुत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 358ः— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 3 (ड) अंतर्गत गरीब नवाज नगर येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रु. 79,99,894/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 359ः— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 17 ब अंतर्गत राजाबाक्षा श्री. कुंभलकर ते श्री. वानखेडे, श्री. बनोदे ते श्री. बानिया ते नेवारे ते श्री. डहाके यांचे घरापर्यंत सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. श्रीपाद कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 13.77 टक्के कमी दराची निविदा रूपये 27,07,567/– स्विकृत करण्याचा तसेच, हे काम पद क्रमांक (681) A22020130802 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 360ः– सिमेंट कॉंक्रीट रस्ते टप्पा – III अंतर्गत नागपुर शहरातील
{लोककर्म विभाग} रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट मध्ये बांधकाम करण्याकरीता विभागाने तयार केलेल्या ढोबळ प्राकलनिय राशी (Block Estimate) रू. 300.00 कोटीच्या कामाकरीता सविस्तर प्राकलने व कामाची निविदा तयार करणे (कंत्राटदाराच्या कार्यादेशापर्यंतची संपुर्ण कार्यवाही) या करीता पी. एम. सी. (प्री टेंडर एक्टीव्हीटी) ची नियुक्ति करण्याकरीता निविदा बोलविण्यात आल्या असता में. ईन्फ्राकिंग कन्सलटींग इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांची 0.234% दराची निम्मतम निविदेस (प्रत्येक्ष निव्वळ तांत्रिक मान्यता प्राप्त राशीवर आधारीत) स्थायी समिती ठराव क्र. 592 दि. 07.10.2016 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्यानुसार में. ईन्फ्राकिंग कन्सलटींग इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे या संस्थेस सदर्हु काम दोन (2) महीण्याचे मुदतित पुर्ण करण्यास्तव कार्यादेश क्र. 663/G/EE(C)/2016 दि. 18.10.2016 अन्वये देण्यात आला त्यानुसार संस्थेने दिलेल्या मुदतीत एकुण 6 पॅकेजेसचे विस्तृत प्रकल्प अहवालासह, सविस्तर प्राकलने तयार करून त्यास रितसर प्रशासकिय मान्यता प्राप्त करण्यात आली.

प्रशासकिय मान्यतेनंतर सदर्हु कामास्तव दि. 20.12.2016 रोजीचे जाहीरातीनुसार ई – निविदा मागविण्यात आल्या, परंतु दि. 30.05.2017 पर्यंत सदर्हु निविदेस मुदत वाढ देऊन सुध्दा निविदाकारांकडुन निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने त्या ई – निविदा रद्द करून सहा (6) पॅकेजेसचे दहा (10) पॅकेजेस मध्ये रूपांतर करून त्यास स्थायी समिती, मा जिल्हाधिकारी, मा. विभागीय आयुक्त या विविध प्राधिकरणाच्या फेर मंजुरीनंतर दि. 10.10. 2017 चे जाहीरातीद्वारे ई – निविदा मागविण्यात आल्या. त्यापैकी पाच (5) पॅकेजेसला अल्प प्रतिसाद मिळाल्याने त्या पाच (5) पॅकेजेसच्या फेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.तसेच एक अंदाजपत्रक (पॅकेज–11) अदयाप बाकी आहे. त्यात टप्पा –1, टप्पा –2, मधिल सुटलेल्या सर्व बाबी घ्यायच्या आहेत. टप्पा –3 चे पॅकेज क्र. 1 ते 10 चे कामाचे कार्यादेश निर्गमीत झाल्यानंतर लगेच पॅकेज क्र. 11 चे कामाचे विस्तृत प्राकलन सादर करून त्यास मा. विभागीय आयुक्त स्तरीय समितीची प्रशासकीय मान्यता प्राप्त करावयाची आहे. त्यामुळे टप्पा –III करीताचे काम पुर्ण करण्यास अजुन कालावधी लागणार आहे.

उपरोक्त नमुद प्रमाणे सहा (6) पॅकेजेसचे, रूपांरत दहा (10) पॅकेजेसमध्ये करणे, त्याप्रमाणे त्या कामांचा विस्तृत अहवाल व फेर प्राकलने तयार करून विविध प्राधिकरणाच्या फेर मंजुरी प्राप्त करणे या अतिरीक्त बाबींचा संस्थेच्या मुळ कामाचे व्याप्ती मध्ये समावेश नसल्याने व हे काम पुर्ण करण्यास्तव उपरोक्त नमुद तांत्रीक अडचणीमुळे होत असलेल्या विलंबास्तव में. ईन्फ्राकिंग कन्सलटींग इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांची 0.234% (ढोबळ प्राकलनिय राशीचे अनुषंगाने रू. 70,20,000/- राशीची) दराची प्राप्त निम्मतम निविदेस 0.280% (ढोबळ प्राकलनिय राशीचे अनुषंगाने रू. 84,00,000/- राशीची) एवढी दरवाढ मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 361ः– प्रभाग क्र. ६२ जानकीनगर रिंग रोड चौक ते श्री. नखाते
{लोककर्म झोन 03} यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. संतोष खरपकर यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १२.०३ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ८७,१९,९४८/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 362ः– प्रभाग क्र. 17 ब अंतर्गत वंजारी नगर मैदान परिसरात
{लोककर्म झोन 04} रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 06 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. श्रीपाद कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 12.97 टक्के कमी दराची निविदा रूपये 38,26,084/– (रूपये अळतीस लक्ष सव्वीस हजार चौ–यांशी रूपये फक्त) स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्रमांक (681) A22020130802 अंतर्गत

प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 363:— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 17 ब राजाबाक्षा टेंम्पल गेट येथील श्री. ताकसांडे ते मनिषा हार्डवेअर आणि श्री. फेंडर यांचे घरापर्यंत सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 07 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. श्रीपाद कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 13.27 टक्के कमी दराची निविदा रूपये 39,59,058/— स्विकृत करण्याचा तसेच, हे काम पद क्रमांक (681) A22020130802 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 364:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्रमाक १२ ड येथील हजारीपहाड घाट येथे स्थापत्य व सौंदर्यीकरणाच्या कामाच्या रू. ४१,३६,६८५/— च्या प्राकलनास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 365 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

श्रीमती संगिता गिऱ्हे :— मा.सभापती महोदय, साईबाबा कॉलनी मध्ये 12 महिने पाण्याचा त्रास असतो या हिवाळयाच्या दिवसात 3 ते 4 दिवसापासुन त्या ठिकाणी टॅकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. श्री.इंगळे, श्री.ईरखेडे, श्री.आसोले यांच्या घरी अजिबात पाणी येत नाही याकडे जातीने लक्ष देण्यात यावे.

सभापती :— झिंगाबाई टाकळी या भागात अनेक वस्त्यामध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे मधुसुधन नावाचे जे व्यक्ती पाणीपुरवठयाचे काम पाहत आहे त्यांना हे काम व्यवस्थित करता येत नाही. मागच्या अनेक दिवसांपासुन बंधुनगर, गितानगर या ठिकाणी पाण्याचा त्रास आहे त्यावर आपण कारवाई केली पाहिजे.

श्री.हरीश ग्वालबंशी :— मा.सभापती महोदय, सुरेंद्रगढ मे पानी का फ्लो कम होने के कारण चार दिन तक लोगो को पानी नही मिला। चार दिन के बाद कल एक से देढ घंटा लोगो को पानी दिया गया। पानी का फ्लो बढाया जाये ताकी लोगो को समप्रमाण मे पानी मिले।

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

स्थायी समिती सभा ठराव/ठराव क्र.          दि. 29.11.2017 (उपसमितीचा अहवाल व परिशिष्ट 'अ')